This question paper consists of 37 questions and 8 printed pages.
ह्या प्रश्नपत्रिकेत एकूण 37 प्रश्न आणि 8 छापील पाने आहेत.

Roll No. | | | | | | | | | | | | Code No. 58/S/A/M
अनुक्रमांक कोड नं.

Set - A

# MARATHI
## (मराठी)
## (204)

Day and Date of Examination
(परीक्षेचा दिवस आणि तारीख) ____________________

Signature of Invigilators 1. ____________________
(निरीक्षकाची सही)
2. ____________________

**सामान्य अनुदेश :**

1 परीक्षार्थीने प्रश्नपत्रिकेच्या प्रथम पृष्ठावर आपला अनुक्रमांक लिहावा.

2 कृपाकरून प्रश्न–पत्र तपासून घ्या की पुस्तकाचे एकंदर पृष्ठ आणि प्रश्नांची संख्या प्रथम पृष्ठावर सर्वात वर छापलेली आहे, तेवढीच आहे किंवा नाही. तसेच प्रश्नांची संख्यापण क्रमिक रूपात असावी.

3 बहुपर्यायी प्रश्नांचे उत्तर देतांना तुम्हाला दिलेल्या पर्यायांतून योग्य तो पर्याय निवडावयाचा आहे. वेगळी देण्यांत येणाऱ्या उत्तर–पुस्तिकांमधे योग्य उत्तर लिहायचे आहे.

4 बहुपर्यायी प्रश्नांचे सोबतच सर्व प्रश्नांची उत्तरे निर्धारित वेळेतच द्यावयाची आहेत. बहुपर्यायी प्रश्नांसाठी जास्त वेळ देण्यांत येणार नाही.

5 उत्तर–पत्रिकेत ओळख निर्दशनास आणणे आणि योग्य जागेच्या व्यतिरिक्त अनुक्रमांक लिहल्यास परीक्षार्थीला अयोग्य ठरविण्यांत येईल.

6 आपल्या उत्तर–पत्रिकांवर प्रश्न–पत्रिकेचा कोड संख्या **58/S/A/M-A** लिहावेत.

# MARATHI
## (मराठी)
## (204)

वेळ : 3 तास] [एकूण गुण : 100

**निर्देश :**

**1** **सर्व** प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.

**2** **सर्व** प्रश्न लक्षपूर्वक वाचून मगच प्रश्नाचे उत्तर लिहावे.

**3** प्रश्न **1** ते **11** पर्यंत प्रत्येकी चार पर्याय दिले आहेत. त्यातील योग्य पर्याय निवडून लिहावा.

---

**1** झेल्याचे नाव काय होते ? **1**

(A) जमाल (B) जगदीश

(C) सदाशिव (D) जालंदर

**2** सुशिक्षितांना केसरी पत्र चालणार नाही असे का वाटले ? **1**

(A) केसरी पत्र आठवडयातून दोनदाच काढले जाई.

(B) ते निव्वळ मराठीत काढले होते.

(C) केसरीपत्राची भाषा अवघड होती.

(D) केसरी पत्र केवळ इंग्रजी मराठीतूनच काढले होते.

**3** देशाचे सगळ्यात मोठे धन कोणते आहे ? **1**

(A) पैसा (B) शस्त्रास्त्र

(C) मुले (D) प्रदेश

**4** कवीला कोणता वनवास प्रिय वाटतो ? **1**

(A) भारतभूमीच्या वनीचा (B) फुलबागेचा

(C) आंग्लभूमीचा (D) सागराचा

5 हिंदुस्थानचा दक्षिण भाग कसा असेल असे लेखकाला वाटत होते ? 1

(A) लहान (B) चिंचोळा

(C) विस्तीर्ण (D) चिमुकला

6 काही उग्र स्थिती सांडावी । काही ............ धरावी. 1

(A) स्थिरचित्ता (B) धीरचित्ता

(C) सचिंता (D) सौम्यता

7 ''आधुनिक भारतामधला अण्णा हे एक अद्‌भुत चमत्कार होते.'' असे लेखकाने का म्हटले आहे ? 1

(A) अण्णांनी आयुष्यात खूप चमत्कार केले.

(B) अण्णा एकशेपाच वर्षे जगले.

(C) जे जे मनोरथ त्यांनी रचले ते पूर्ण झालेली पाहण्यासाठी त्यांना निरामय निरपधात आयुष्य लाभले.

(D) अण्णा म्हणजे भारताच्या इतिहासातील एक क्रांतिकारक शतकाचे शेवटचे साक्षीदारच होते.

8 या देशाची माती कशी आहे ? 1

(A) काळी (B) लाल

(C) महान (D) पवित्र

9 योग्य वाक्प्रचार लिहून वाक्य पूर्ण करा. 1

रमाकाक् सीताबाईच्या नावाने ............

(A) सुपारी देणे

(B) डोळे वटारणे

(C) खडे फोडणे

(D) दात काढणे

10 खालील पैकी कोणता शब्द शुद्ध स्वरूपात आहे ? 1

(A) कलीयुग (B) कलियुग

(C) कलियूग (D) क्लीयुग

11 खालीलपैकी कोणत्या वाक्यात केवलप्रयोगी अव्यय वापरले आहे ? ते ओळखा. 1

(A) मी बाहेर पडलो आणि पावसाला सुरूवात झाली.

(B) झाडावर पावसाचे थेंब पडतात.

(C) अहाहा ! किती सुंदर चांदणे पडले आहे !

(D) ती आली परंतु मी धरी नव्हते.

12 खालील उतारा वाचून त्या खालील प्रश्नांची उत्तरे तुमच्या शब्दात लिहा.

अनेक लोक अतिशयोक्तीवर आधारलेल्या विनोदाला नाके मुरडततात पण हा गैरसमज अज्ञानावर आधारलेला आहे. माझी त्यासंबधीची भूमिका वेगळी आहे. सत्याचे आकलन केवळ वास्तवदृष्टीनेच त्याच्या कडे पाहून होते असे नव्हे. कधी–कधी सत्याकडे अवास्तव किंवा विपर्यस्त दृष्टीने बघावे लागते म्हणजे त्याच्या मर्यादा समजतात फुगीर किंवा खोलगट आरशात अगदी शांतपणे आणि गंभीरपणे उभे राहिलो तरं आपल्या आकृतीचे भयानक रूप आपल्याला आपल्या डोळ्यांनीच पाहावयास मिळते. तथापि त्यामुळे आपल्या ला त्या आरशाचा तिरस्कार वाटत नाही. किंबहुना तासन् तास त्या आरशासमोर उभे राहून आत्मरंजन करण्याचा मोह आपल्याला अनावर होतो; त्याचे रहस्य काय आहे ? तेच विनोदात अतिशयोक्तीचे आहे. केवळ विनोदालाच नव्हे तर सामान्य जीवनातही अतिशयोक्तीला पार मोठे स्थान आहे. कारण त्याखेरीज आपणाला वास्तवाची कल्पनाच येऊ शकत नाही. 'माझ्या सर्वांगाची आग झाली.' 'लाथ मारीन तेथे पाणी काढीन.' 'माझ्या पोटात कावळे ओरडू लागले आहेत'. अशी भाषा आपण वापरतो सहजपणे किंवा ऐकतो. अतिशयोक्ती काय याहून वेगळी असते ?

**प्रश्नः –**

(अ) अतिशयोक्तीवर आधारित विनोदाविषयी लेखकाचा दृष्टीकोन कोणता आहे ? 2

(ब) सामान्य जीवनातही कोणत्या गोष्टीला फार महत्त्व आहे ? 1

(क) या उताऱ्यात कोणते वाक्प्रचार आले आहेत ? 1

13 खालील काव्यांश लक्षपूर्वक वाचून विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे आपल्या शब्दांत लिहा.

**काव्यांश**

संतांचा अनुभव संतचि जाणत्ति ।
येर ते हासति अभाविक ॥ १ ॥
नामाचा प्रताप प्रल्हादचि जाणे ।
जन्म–मरण येणे खुंटविले ॥ २ ॥
सेवेचा प्रकार जाणे हनुमंत ।
तेणे सीताकांत सुखी केला ॥ ३ ॥
सख्यत्वे पूर्णता अर्जुना बाणली ।
ऐक्य रूपे चाली मिरविली ॥ ४ ॥

**प्रश्नः –**

(i) या अभंगाची रचना कोणी केली आहे ? **1**

(ii) संतांचा अनुभव कोण जाणतो ? **1**

(iii) जन्म–मरण कोणी खुंटविले आहे ? **1**

(iv) हनुमंताने कोणता प्रकार जाणला आहे ? **1**

14 एखादे दिवशी मागूनही अन्न मिळाले नाही तर डोंबारी काय खातात ? **1**

15 चोराच्या उडीचा आवाज ऐकून नागूच्या बायकोला काय वाटले ? **1**

16 लेखकाला कोणत्या जुन्या गोष्टी जपून ठेवाव्याशा वाटतात ? **1**

17 (अ) शास्त्रात आईचा गौरव कोणत्या शब्दात केला आहे ? **2**

(ब) शेतकरी कलेक्टर साहेबांकडे कशासाठी गेला होता ? **2**

18 (अ) प्रा.टी. तोताद्री अय्यंगार यांना खऱ्या अर्थाने 'गुरु' असे डॉ. कलाम का म्हणतात ? 3

(ब) शाळेत असताना केशवच्या देशभक्तीचे दर्शन कसे घडते ? 3

19 ''तुला असे का वाटते की फक्त तुझेच लोक तेवढे स्वच्छ राहतात !'' असे कोणी कोणास म्हटले आहे ? 1

20 (अ) लेखकाच्या मनामध्ये एकटेपणाची, क्षुदतेची भावना का निर्माण झाली ? 3

(ब) महर्षी कर्वे यांच्या लोकविलक्षण व्यक्तिमत्त्वाचे कोणते विशेष लेखकाने सांगितले आहेत ? 3

21 आकाशात उडणाऱ्या बगळ्यांची रांग पाहून बालकवींच्या मनात कोणत्या कल्पना येतात ? 1

22 तळ्यातील प्रत्येकजण बदकाच्या पिल्लाशी कसा बोलतो ? 1

23 कवी नामदेव ढसाळ यांनी 'फकीर' कोणास म्हटले आहे ? 1

24 (अ) 'सोनं आणि माती' पदरात घेते असे धरधनीण का म्हणते ? 2

(ब) महान कार्य यशस्वी करण्यासाठी राजाने कसे वागले पाहिजे असे रामदास्वामी संभाजीराजांना पत्रातून कळवितात ? 2

25 वेलीवर उमलणारे फूल पाहून कवीला काय वाटते ? 1

26 (अ) ईश्वराची पावले कधी दिसली का, या कवीच्या प्रसाला चांदण्या काय उत्तर देतात ? 3

(ब) संत ज्ञानेश्वरांनी ईश्वराच्या भक्ताचे वर्णन कोणत्या शब्दांत केले आहे ? 3

27 (अ) कवी सानेगुरुजी यांनी देशबांधवांना कशासाठी आवाहन केले आहे ? 3

(ब) 'या जगण्यावर शतदा प्रेम करावे.' असे कवी मंगेश पाडगावकर का म्हणतात ? 3

28 पुढील म्हणींचा अर्थ लिहून स्वतःच्या वाक्यात म्हणींचा प्रयोग करा. (कोणतीही एक म्हण) 1

(i) चार दिवस सासूचे

(ii) नावडतीचे मीठ अळणी

**29** पुढे दिलेल्या शब्दसमूहाला एक शब्द सुचवा. **1**

(i) शंभर वर्षे आयुष्य जगणारा.

(ii) विद्यार्थ्यांसाठी राहण्याची जागा.

**30** खालील वाक्ये वाचून त्यातील क्रियापद ओळखा व क्रियापदाचा काळ कोणता आहे ते लिहा. **1**

(i) आकाशात काळे ढग आहेत.

(ii) मी पुस्तक वाचले.

**31** भारत आणि पाकिस्तान यांच्यातील खेळांडूमध्ये एकदिवसीय क्रिकेट सामना तुम्ही टी.व्ही वर पाहिला, तुमच्या बरोबर दोन मित्रांनीही पाहिला, यासंबधीया संवाद लिहा. **4**

**32** खालील पैकी कोणत्याही एका विषयावर (200) शब्दांत निबंध लिहा. **10**

(i) विज्ञान–शाप की वरदान

(ii) माझी आई

(iii) आज शिवराय अवतरले तर !

(iv) माझा आवदता सण

**33** या पाठ्यपुस्तकातील कोणता पाठ तुम्हाला सर्वात जास्त आवडला ? का आवडला ? त्या पाठाचे नाव लिहा. **4**

**34** खालील पैकी कोणत्याही एका विषयावर पत्र लिहा. **8**
पत्रलेखनात पत्रलेखनाचे नियम कटाक्षाने पाळा.

(i) तुमचा मित्र जिल्हापातळीवर धावण्याच्या स्पर्धेत पहिला आल्याबद्धल त्याचे अभिनंदन करणारे पत्र लिहा.

(ii) तुमच्या परिसरातील विजेचे दिवे लागत नसल्याने अंधार असतो, रस्त्यावरील दिवे लावण्यासाठी ग्रामपंचायत नगरपालिका यांना पत्र लिहून कळवा.

(iii) शाळेच्या ग्रंथालयासाठी 'मुले चोर पकडतात' रत्ने ही गंगाधर गाडगीळ यांनी लिहीलेली दोन पुस्तके पॉप्युलर प्रकाशन, 36 सी. पं. मालवीय मार्ग ताडदेव. मुंबई 400034. मागविण्यासाठी त्यांना पत्र लिहा.

**35** (अ) खाली दिलेल्या शब्दांचे दोन–दोन समानार्थी शब्द लिहा. **2**

(i) वेळ

(ii) पृथ्वी

(ब) पुढील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा. **2**

(i) अनुकूल

(ii) अनिष्ट

(iii) कळस

(iv) कडू

**36** पुढील उतारा लक्षपूर्वक वाचा व स्वतःच्या भाषेत त्याचे (एक तृतियांश) सारांशलेखन करा; त्याला योग्य शीर्षक द्या. **4**

तुम्ही कधी रानावनातून, आंब्याच्या बनातून हिंडलात का ? सृष्टीचा अत्यंत लाडका पुत्र म्हणजे मोर, तुम्ही कोठेतरी पाहिला असेल ! तो चालू लागला म्हणजे त्याचे चालणे देखणे वाटते. या सुंदर पक्ष्याला बनवताना सृष्टीदेवना अगदी खुश असली पाहिजे. त्याच्या डोक्यावर सृष्टीने आपल्या हाताने सुंदर तुरा खोवला आहे. प्रत्येक पावलाबरोबर डुलणारे डूल कानात घातले आहेत. मानेवर विविध रंगांची मिश्रणे लावली आहेत. त्याचा पिसारा रचताना सृष्टीने आपले सारे धन खजिन्यातून बाहेर काढले असले पाहिजे. त्याला अतिशय आनंद झाला की आंब्याच्या बनात कसा थुईथुई नाचू लागतो. आकाशात ढग जमा झाले की मेघांची गर्जना सुरू होते. मग या मोराला आपल्या 'राष्ट्रीय पक्ष्याला' अत्यानंद होतो आणि तो आपला भव्य आकर्षक असा पिसारा पसरतो. त्यावेळी सौंदर्याचे सगळे विश्व उभे राहते. सृष्टीचे देणे असे असावे.

**37** खालील माहितीच्या आधारे वृक्ष–आलेख तयार करा – **4**

ज्वारी, बाजरी, गहू, तांदूळ ही अन्नधान्ये, आहेत तर तूर, उडीद, मठ, वाटाणा ही कडधान्ये आहेत. या धान्यप्रकारांचा वृक्ष–आलेख तयार करा.

---